ISSN : 2278-93

# Sanshodhan Samiksha

**Humanities, Social Sciences, Commerce, Education, Law and Language**

**Monthly Peer Reviewed International Research Journal**

## Special Issue November - 2015




☐ Chief Editor - Prof. Virag S. Gawande
☐ Editor - Dr. Sanjay J. Kothari
☐ Editor - Dr. Dinesh W.Nichit

PUBLISHED BY

AADHAR SOCIAL RESEARCH & DEVELOPMENT TRAINING INSTITUTE, AMRAVATI, MS.

# INDEX

## SECTION (B) - Marathi


| Sr. No | Author | Title of Research Paper | Pg.No |
|---|---|---|---|
| 1 | प्रा. रूपवते गणेश दादासाहेब | पहिले जागतिक महायुध्द व मानसशास्त्र | 1 |
| 2 | प्रा. कु. पौर्णिमा एच. रहांगडाले | ई - लर्निंग | 4 |
| 3 | डॉ. मधुकर नारायण गोसावी | भारतीय शेतकऱ्यांच्या दारिद्रय निर्मुलनाचे आव्हान | 7 |
| 4 | प्रा. माधुरी प्र. पाटील | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची वृत्तपत्रे एक ऐतिहासिक अध्ययन | 12 |
| 5 | प्रा. डॉ. वाय एम. साळुंके | नाझीवादाचा उदयःआत्यंतीक राष्ट्रवाद | 18 |
| 6 | प्रा.डॉ.संजय र. गुडधे | भारतीय समाजातील स्त्रि-पुरुष विषमतेची सामाजिकता | 23 |
| 7 | प्रा. दिनू लक्ष्मण पाटील | भटका समाज,खान्देशातील वैदू (दारिद्र्य, बेरोजगारी, स्थलांतर आणि पर्यावरण) | 28 |
| 8 | डॉ.बळीराम दत्तात्रय कटारे | २०१४ ची भोकरदन विधानसभा निवडणूक : नवतरुण नेतृत्वाला संधी | 32 |
| 9 | प्रा. डॉ. कुसमेंद्र गं. सोनटक्के | ब्रिजलाल बियाणी यांचे विदर्भातील दहिहांडा सत्याग्राहमध्ये केलेले कार्य | 35 |
| 10 | प्रा. महेंद्र द. झलके | ग्रामजीवनयोगी राष्ट्रसंत | 37 |
| 11 | मिलिंद द. तायडे | जर्मनी का नाजीवाद | 41 |
| 12 | प्रा.डॉ.चंद्रकिरण घाटे | संगीत इस प्रदर्श्य कला में रिमिक्स, फ्युजन पाश्चात्य संगीत का प्रवेश | 45 |
| 13 | प्रा. डॉ. ज्योती प्रमोद राखुंडे डॉ. सुधीर आष्टूनकर, | स्वामी विवेकानंदांचे शिक्षण विषयक विचार | 48 |
| 14 | प्रा.डॉ.शिवाजी महादेव होडगे | दलित कादंबरीतील स्त्रीचित्रण | 52 |
| 15 | प्रा. डी.व्ही.गजभिये | भारत सरकारच्या प्रत्यक्ष विदेशी गुंतवणुक धोरणाचा प्रभाव | 56 |
| 16 | प्रा.डॉ.सौ.अरुणा.प्र.पाटील. श्री.शशीकांत रु.कडू. | अमरावती जिल्हयातील कृषी विकास योजना शेती साठी महत्चाचा स्त्रोत - एक दृष्टीक्षेप | 59 |
| 17 | प्रा. सचिन रमेश निंभोरकर | कुकुरमुत्ता के संदर्भ में निराला का व्यक्तित्व | 64 |
| 18 | प्रा.डॉ.सौ.यु.आर.पाटील | केतकरांच्या कादंबरीतील राजकारण | 69 |
| 19 | प्रा. सतीश आनंदराव काळे | खिलाडियो के चयन में प्रशिक्षक की महत्वपुर्ण भुमिका | 73 |
| 20 | प्रा.कु.वर्षा रामकृष्ण बोपचे | महापुर | 76 |
| 21 | प्रा.आ.दि.चव्हाण | मराठवाडयातील कृषी जलसिंचनाचे महत्त्व व अडचणी | 80 |

ISSN - 2278-9308

# नाझीवादाचा उदय:आत्यंतीक राष्ट्रवाद

**प्रा. डॉ. वाय एम. साळुंके**
कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,ओझर मिग, ता. निफाड जि. नाशिक

इ.स. १९१८ मध्ये पहिले महायुध्द संपले. आतंरराष्ट्रीय शांतता व सुरक्षिततेसाठी राष्ट्रसंघाची स्थापना झाली. युध्दोत्तर प्रश्न सोडविण्यासाठी पॅरिस शांतता परिषद भरविण्यात आली. मात्र हे सर्व प्रयत्न कमी पडले. इ.स. १९२० ते १९३९ हा वीस वर्षांचा कालखंड दुसऱ्या महायुध्दाची तयारी करण्याचा कालखंड ठरला प्रे. विल्सन यांनी महायुध्दाचे वर्णन पुढील शब्दात केले होते "जगातील लोकशाही सुरक्षित ठेवण्यासाठी तसेच जगातील युध्दे कायमची नष्ट करण्यासाठी महायुध्द होते". मात्र प्रे. विल्सन यांचा उदारमतवाद टिकला नाही उलट युध्दाची जणूकाही मालिकाच सुरू झाली. व्हर्सायच्या तहात जर्मनीला युध्द गुन्हेगार ठरविण्यात आले. मोठया प्रमाणावर युध्द खंडणी लादण्यात आली. प्रादेशिक चिरफाड करण्यात आली. यामुळे समर्थ, स्वाभिमाणी राष्ट्राने व्हर्सायचा तह स्विकारून तात्पुरती शरणागती पत्करली. योग्य वेळी राष्ट्र संघ, व्हर्सायचा तह झुगारून दिला. सूड व व्देषापोटी पुन्हा एकदा संघर्षाकडे वाटचाल या राष्ट्राने केली. जर्मन जनता आत्यंतिक राष्ट्रवादी नेत्याच्या शोधात होती. हिटलरच्या रूपाने तो त्यांना मिळाला.

**हुकूमशाही**

रोमन प्रजासत्तकात नागरी किंवा लष्करी पेच प्रसंगाच्या वेळी हुकूमशहा नेमला जाई व त्याच्या हातात सत्ता केंद्रित होत असे. त्यावरून ही संज्ञा निर्माण झाली आहे. सर्व राजकीय कृतीवर जेव्हा एक व्यक्ती अधिकारपद, गट किंवा पक्षाचे पूर्ण नियंत्रण असते व इतर सर्व नागरिकांवर आज्ञापलनाची सक्ती करण्यात येते तेव्हा त्या शासनपध्दतीस हुकूशाही असे म्हणतात. ज्या प्रमाणे जनकल्याणाचा हेतू असणारा राजा असू शकतो त्या प्रमाणे जनकल्याणाची तमा बाळगणारा हुकूमशहा देखील असू शकतो. (१) हुकूमशहीचे दोन प्रकार आहेत. १) लष्करी, २) नागरी, पहिल्या महायुध्दानंतर अशी लष्करी हुकूमशाही जर्मनी इटलीत अस्तित्वात आली.

**नाझीवाद**

नॅशनल सोशॅलिस्ट जर्मन वर्कर्स पार्टी (नाझी) जर्मनीमध्ये बिस्मार्क, मोल्टके, नित्शे, ट्रॅटश्के व हेगेल यांच्या वेळे पासून आत्यंतिक राष्ट्रवाद, हुकूमशाही, शुध्दवाद वंशद्वेष व वांशिक श्रेष्ठता यावर आधारलेल्या तत्वज्ञानाची परंपरा होती. विख्यात जर्मन तत्वज्ञ ओस्वाल्ड स्पेंगलर यानी देखील लोकशाही विरोधी व शांतता विरोधी मत केले आहे. लोकशाही हा मुळी भ्रमच आहे. ही वैचारीक परंपरा जर्मनीमध्ये निर्माण झाली होती. यातूनच हिटलरने जीवनाचे तत्वाज्ञान आपल्या आत्मचरित्रात माइन काम्प (माझा लढा) मध्ये स्पष्ट केले आहे. लोकांसाठी सर्वकाही, लोकांकरवी काही नाही, लोकांच्या द्वाराकाही नाही. हे ब्रीद वाक्य नाझीवादाने लोकशाहीला शह देण्यासाठी स्विकारले(२) नाझीवाद हा अतिमानुष महान नेत्याच्या दुरदृष्टीने आणि शहाणपणाने प्रस्थापित झालेल्या सत्यावरच विश्वास ठेवतो. हिटलरने आपल्या आत्मचरित्रात आपले लोकशाही विरोधी मत स्पष्ट शब्दात मांडले आहे. तो म्हणतो बहुमताच्या निर्णयावर कायदेकानून घडविण्याचे संसदीय लोकशाहीचे तत्वच मुळी प्रभावी व्यक्तीची सत्ता नाकारते आणि प्रभावी व्यक्तीच्या ऐवजी असंख्य आणि अज्ञानी अशी डोकी सत्तास्थानावर नेऊन बसविते. हे सर्व निसर्ग नियमाच्या विरूध्द आहे याचाच अर्थ नाझीवाद हा सामान्य व्यक्तीच्या कुवतीवर विश्वास ठेवीत नसून सामान्यजंनानी असामान्य पुढाऱ्यालाच मानले पाहिजे असे शिकवितो. नाझी तत्वज्ञानात युध्दाचे महत्त्व व महात्म यांचे वर्णन पुढील प्रमाणे केले आहे. केवळ शाब्दिक धिक्काराने पराभूत राष्ट्राला न्याय मिळत नसतो. न्याय प्राप्त करून घेण्यास स्वातंत्र्यासाठी व मानवासाठी त्या राष्ट्रांने आपल्या तलवारी ने उत्तर दिले पाहिजे.

नाझीवादात व्यक्ती महात्म, वंशमहात्म, राष्ट्र महात्म, या गोष्टीवर भर देण्यात आलाआहे. जर्मन लोक हेच खरे शुध्द आर्य वंशाचे असून जर्मन राष्ट्र हे सर्वश्रेष्ठ आहे. परमेश्वरी संकेतच मुळी असा आहे की जर्मन वंशाने जर्मन राष्ट्राने इतर सर्वांवर आणि पर्यायाने जगावर आपले प्रभुत्व प्रस्थापित करावे.

प्रखर राष्ट्रवाद

जर्मनलोक राष्ट्रभिमानी होते. त्यांचा व्हर्सायच्या तहात अपमान झाला होता. परंतु राष्ट्रप्रेम कमी झाले नव्हते आणि जर्मन जनता कुशल संघटकाची वाट पहात होती. हिटलरने जनतेच्या मनात वंशाच्या श्रेष्ठत्त्वांची कल्पना रूजवाली आणि आर्य वंशाची शुध्दत्व राखण्यासाठी इतर वंशीयाना नष्ट करण्याचा त्याने सपाटा चालविला. राष्ट्रविषयी स्वाभिममान वाटण्यासाठी उत्तम प्रचार करून जनमत तयार केले. ज्यु लोंकाची व साम्यवाद्यांची धरपकड करून हल्ला केला. २९ प्रमुख प्रांटेस्टंट चर्चने एकत्र येऊन जर्मन इन्हॉजोलिकल चर्चस्थापण केले. धार्मिक एकात्मतेमुळे राष्ट्रीय एकात्मतेला पोषक असे वातावरण तयार करण्यात आले. राष्ट्रहितासाठी व्यक्तीने त्याग केला पाहिजे. आंतरराष्ट्रीय प्रश्न पाशवी बळानेच सुटतात हा नाझीवाद्यांचा आवडता सिध्दांत होता. राष्ट्र म्हणजे परमेश्वर ही नाझी तत्त्वज्ञानाची शिकवण होती.

लष्कराची उभारणी

राष्ट्र प्रबळ करण्यासाठी लष्करी सामर्थ्य अंत्यत बलवान असावे अशी धारणा होती. युध्दाशिवाय राष्ट्राला झळाळी नाही.

**एकतंत्री शासन**

नाझी पक्षाचे एकपक्षीय शासन असावे असे हिटलरचे मत होते. त्याचा लोकशाहीचा विरोध होता. हिटलर च्या आत्यंतीक राष्ट्रवादामुळे वंश श्रेष्ठत्वाच्या भावनेमुळे व व्हर्सायच्या तहाचा बदला घेण्याचा प्रवृत्तीमुळे एकतंत्री शासन पध्दती व फाजील आत्मविश्वासामुळे लष्करी सामर्थ्याच्या जोरामुळे पुन्हा एकदा जगाला दुसऱ्या महायुध्दाला तोंड दयावे लागले.

**साम्यवादाला विरोध**

मार्क्सवाद किंवा साम्यंवाद याची हिटलरला मनस्वी चीड होती. जर्मन राष्ट्राचे भवितव्य सुरक्षित ठेवायचे असेल तर जर्मनीतून साम्यवादाचे उच्चाटन झाले पाहिजे असे सांगून त्याने कामगारांना राजकारणापासुन अलिप्त ठेवले. माझा लढा ग्रंथात पहिल्या पानावर हिटलरने लिहिले आहे. रशिया हा जर्मनीचा एक नंबरचा शत्रु राष्ट्र आहे.

**वंशश्रेष्ठतेची कल्पना**

एकाच वशांचे लोक देशात असले पाहिजेत अशी कल्पना त्याने उचलुन धरली. त्यासाठी जर्मन वंशाखेरीज इतर वंशाचे जर्मनीत असलेले लोक हाकलून लावले पाहिजेत व युरोपातील सर्व वंशात त्यांचा वंश चांगला वरचा व आर्याचा वंश म्हणजे जर्मनवंश सर्वोत्तम अशी त्याची समजूत होती जर्मन वंशीय लोक जर्मनीत समाविष्ट झाले पाहिजेत. अशा प्रकारे हिटलरची शिकवण हेती. हा नाझी पक्षाचा कार्यक्रम होता. जर्मनीत असलेले परकीय लोक जर्मनीच्या अधोगतीस जबाबदार आहेत. असे त्यांचे मत होते. जर्मन वंशाचे लोक सर्वश्रेष्ठ असून संपूर्ण जग जिंकून घेण्याकरिता त्यांचा जन्म आहे. असाच त्यांचा समज होता.

राजकीय तत्वज्ञान समाजातील सर्व संस्थापेक्षा राज्यसंस्था सर्वश्रेष्ठ आहे. राज्याची सत्ता सार्वभौम अनियंत्रित असते. हा प्रमुख मुद्दा होता. नाझी तत्वज्ञानाला साम्राज्यवादी वृत्ती प्रिय होती.

**अपमानास्पद व्हर्सायचा तह**

व्हर्सायच्या करारामुळे हिटलर आणि त्याच्या नाझीवादाचा उदयझाला. पहिल्या महायुध्दामुळे जर्मनीचे अपरिमित नुकसान झाले. संपूर्ण देशात निराशाचे वातावरण निर्माण झाले होते. ज्या उत्साहाने जर्मनीने युध्दात भाग घेतला होता तो आता पार मावळला होता. कारण त्या राष्ट्राचा पराजय झाला होता. व्हर्सायच्या कराराने तर जर्मनीचा राष्ट्रीय अपमान झाला होता. युध्द गुन्हेगारीसारखे अपमानास्द कलम जर्मनीवर लादण्यात आले होते. जर्मनीच्या वसाहती तिच्या हातुन काढुन घेऊन दोस्तांनी आपल्या ताब्यात घेतली होती. कंबरडे मोडेल एवढा युध्ददंड लादण्यात आला, जर्मनीच्या ताब्यातल शस्त्रास्त्रे, जहाजे दोस्तांनी आपल्या ताब्यात घेतली होती. व्यापार ठप्प करणाऱ्या व्हर्सायच्या कराराने जर्मन मनात तीव्र असंतोष निर्माण झाला. व्हर्साय करारात सामील होणारी सर्व राष्ट्र लोकशाही प्रधान होती. त्यामुळे युध्दोत्तर अस्तित्वात आलेल्या वायमर सरकार विरूध्द जर्मनीत तीव्र असंतोष होते. त्याचा हिटलरने पुरेपूर फायदा करून घेतला.

**लोकशाहीवादी विचार जर्मन जनतेत रूजले नाहीत**

जर्मन जनतेत सैनिकी वृत्ती रूजली होती. राष्ट्रनेत्याच्या नेतृत्वात त्यांनी आजपर्यंत आपल्या देशाची प्रगती केली होती. विल्यम पहिला, बिस्मार्क, विल्यम दुसरा यासारखे नेते जर्मनीला आजपर्यंत लाभले होते. तसेच जर्मनीत राजवंशीय शासन लोकप्रिय झाले होते. महायुध्दापर्यंत होहेनझोलर्न हे राजघराणे येथे सत्तारूढ होते. त्या देशात लोकसत्तेला काहीही महत्त्व मिळाले नव्हते. पहिल्या महायुध्दानंतर तेथे वायमर लोकसत्ताक स्थापन झाले. पण मुळातच लोकसत्ताकाच्या विरोधात असलेल्या जर्मन मनाचा पाठिंबा वायमर सरकारला कधीच मिळू शकला नाही. हिटलरने कोणताही नवीन कार्यक्रम लोकासमोर ठेवला नाही. हेगेल, कांट, नित्शे, निहीलिस्ट, बिस्मार्क, कैसर दुसरा यांनी सांगितलेले विचार हिटलरने जनतेसमोर मांडले. (३) त्यामुळे जनतेनेही त्याला आपला पूर्ण पाठिंबा दिला.

**जर्मनीची आर्थिकदृष्ट्या दुर्बल परिस्थिती**

जर्मनीवर आर्थिक आपत्ती आली होती. महायुध्दामुळे आधीच जर्जर झालेल्या जर्मनीवर व्हर्सायचा तह लादल्याने दुष्ककाळात तेरावा महिना अशी त्या राष्ट्रांची स्थिती झाली. अन्न, वस्त्रा इ. मूलभूत गरजाचा तुटवडा निर्माण झाला. चलन फुगवटा निर्माण झाला. एवढा की, सुमारे १३३ नोटा छपाईचे छापखाने नवीन कारखाने काढावे लागले जर्मनीतील मुख्य नाणे मार्कला काहीही किंमत उरली नाही. मार्कची किंमत दिवसागणिक, तासागणिक निरंतर वाढु लागली. एका सँडविचची आदल्या दिवशी १४००० मार्क किंमत दुसरे दिवशी २४००० झाली.

**वंशश्रेष्ठत्त्वाची भावना**

जर्मनीला आर्थिक संकटातुन जावे लागत असतानांच मध्यम वर्गीयांमध्ये ज्यू विरोधी वातावरण निर्माण होऊ लागले. कारण ज्यूं मुळेच जर्मनीला पराजयाच्या खाईत पडावे लागले. अशी भावना त्यांच्या मनात रूजली. याशिवाय युध्दकाळात जर्मनीतील बडया कारखान्यांवर ज्यूंचा ताबा होता. सर्वसामान्य लोक ज्यूना शोषकवर्ग मानू लागली. हळूहळू ज्यूं द्वेष वाढु लागला. हिटलरने जर्मनांची ही नाडी अचूक ओळखली. आपल्या भाषणांमधुन ज्यू देशाबाहेर हाकलण्याची भाषा तो वापरू लागला. ज्यू जर्मनीबाहेर गेल्यावर आपोआपच जर्मनांच्या हातात त्यांची मालमत्त पडेल. त्यामुळे लवकरात लवकर त्यांची हकालपट्टी करण्याची भाषा हिटरल करू लागला.

**साम्यवादाचा वाढता प्रभाव**

हिटलरने ज्यु भांडवलदारांविरूध्द जर्मनांच्या भावना भडकावल्या त्यामुळे सर्वसामान्यांचा पाठिंबा त्याला मिळाला. तसेच जर्मनीत साम्यवादाविरूध्द लोकांच्या भावना त्याने भडकाविल्या रशियात साम्यवादी सरकार आल्यावर त्याचे लोण जर्मनीत लवकरच पसरू लागले. इ.स. १९३० मधील निवडणुकीत ८९ साम्यवादी संसदे (राईशस्टॅग) मध्ये निवडून आले. साम्यवाद्यांना निष्प्रभ करण्यासाठी हिटलर आपल्या भाषणामध्ये साम्यवादी देशास कसे घातक आहेत हे तो सांगू लागला. जर्मनीत जर साम्यवाद आला, तर सर्वत्र अंदाधुंदी निर्माण होईल. सामान्यांना जगणे अशक्य होईल असे हिटलर लोकांना पटवुन देऊ लागला.

**राईशस्टॅंगचे अपयश**

जर्मनीत लोकशाही सरकार स्थापण्यात आले. परंतु तेथील राईशस्टॅंग (संसद) मध्ये विविध पक्षांमध्ये मतभेद असल्याने गतिरोध निर्माण झाला. महायुध्दापुर्वीच्या राईशस्टॅंग मधील अनुशासन अजुनही लोकांना आठवत होते. त्यात शिस्त होती. नंतर लोकांचा संसदेवरील विश्वास उडू लागला होता. याउलट त्याचवेळी इटलीमध्ये फॅसिस्ट पक्षाचा उदय झाला होता. फॅसिस्टांचा नेता मुसोलिनीने आपल्या देशाची प्रगती झपाट्याने केली होती. आपल्याही देशात असा नेता निर्माण झाल्यास त्याला आपण पाठिंबा देऊ असे जर्मनांना वाटु लागले. ती संधी हिटलरने अचूक साधली.

**जर्मनीतील लष्करवाद**

मुळातच जर्मन लोक लढाऊ वृत्तीचे होते. पण व्हर्सायचया तहाने त्यांच्या मनोवृत्तीवर घाला घातल्या गेला. जर्मन सैन्याची संख्या कमी करण्यात आली. जर्मनीची सर्व शस्त्रास्त्रे त्या राष्ट्राकडून काढून घेण्यात आली. त्यामुळे असंख्य तरूणांवर बेकारीची कुऱ्हाड कोसळली. त्यातच आर्थिक विपन्नावस्था आल्याने त्यांना नवीन उद्योग काढणेही शक्य झाले

नाही. त्यामुळे पुन्हा आपला सैनिकी पेशा पत्करण्यास ते आतुर झाले. नाझींनी त्यामुळेच आपली स्वयंसेवक सैन्य संघटना उभारली या सैन्याचे दोन विभाग होते पहिल्या भागातील सैनिकांचा खाकी पोशाख असून बाह्यांवर लाल पट्टी असे व तिच्यावर स्वस्तिक चिन्ह होते. नाझी पक्षाचा प्रसार करणे नाझीच्या सभांच्या वेळी त्या विरोधकांनी उधळू नये म्हणुन काळजी घेणे, विरोधकांच्या सभा उधळून लावणे इ. कामे हे सैनिक करीत सैनिकांच्या दुसऱ्या विभागात पोषाख काळा होता. आपल्या नेत्याचे रक्षण करणे हे त्याचे काम होते. (४) बहुसंख्य जर्मन नाझी सैन्यात सहभागी झाले. नाझी पक्ष आपणास पुन्हा पुर्वीची प्रतिष्ठा प्राप्त करून देईल अशी त्यांना खात्री होती. तसेच त्यामुळे बेकारीची समस्या सुटणार होती. या सैन्यामुळे नाझींना सत्ता प्राप्त करता आली. तसेच आपल्या विरोधकांचा धुव्वा उडविता आला. हिटलर आपले सैन्यंसघटन करीत असतांना वायमर सरकारने तिकडे दुर्लक्ष केले. सरकारने सुरवातीलाच जर ह्या सैन्याला आळा घातला असता तर हिटलर एवढा प्रबळ बनला नसता. सोशल डेमॉक्रटिक पक्षाने ह्या सैन्याकडे दुर्लक्ष करण्याचे एक कारण म्हणजे व्हर्सायच्या कराराने दोस्त राष्ट्रांनी जर्मनीचे सैन्य कमी केले. पण नाझींनी पुन्हा सैन्य निर्मितीकडे लक्ष दिल्याने व्हर्सायच्या कराराचे उल्लंघन न करत जर्मनीचे सैन्य तयार होऊ लागले होते. सत्ता बळकावण्याचा हिटलरचा मार्ग मोकळा झाला.

**नाझीवादातून हिटलर लष्करी सत्ताधिश**

हिटलर १९१३ मध्ये साधा सैनीक म्हणून लष्करात भरती झाला. कर्तृत्वामूळे नंतर लष्करी अधिकारी झाला. रणक्षेत्रावर त्याने बजावलेल्या कामगिरीचा त्याला आयर्न क्रास देऊन गौरव करण्यात आला होता. पहिल्या महायुध्दातील जर्मनीने पत्करलेली शरणागती व पॅरीस शांतता परिषदेतील चर्चा यामुळे हिटलरची भावना तीव्र होती. त्याचे मन विषण्णतेने भरून गेले होते. महायुध्दातील अपयशाला ज्यु व समाजसत्तावादी जबबादार आहेत. इ.स. १९२० मध्ये नॅशनल सोशालिस्ट जर्मन वर्कर्स पार्टी (नाझी) पक्षाची स्थापना करून तरूण व उत्साही कार्यकर्ता म्हणून जर्मनीच्या राजकारणात पुढे आला.

वायमर सरकार विरूध्द क्रांतीकारकांच्या कारवाया चालूच होत्या. लष्करी अधिकाऱ्यांच्या मदतीने हिटलरने बंड केले. परंतु बंड फसले व हिटलरला तुरूंगाला टाकले. हिटलरने तुरूंगातच माझा लढा हे आत्मचरित्र लिहीले यात भावी सरकारच्या धोरणाची माहिती होती. हे आत्मचरित्र पुढे नाझीवाद्यांनी गीते सारखे वापरले. १९२० च्या निवडणुकीत नाझीपक्षाने भाग घेतला तेव्हा त्याला कमी जागा मिळाल्या. १९३० च्या निवडणूकीत नाझीपक्षाला कायदे मंडळात १०७ जागा मिळाल्या १९३२ च्या निवडणूकांत नाझीपक्ष जर्मन कायदे मंडळात बहुमताने निवडून आला. हिटलर अध्यक्षपदाच्या निवडणूकीत पराभूत झाला. मात्र नाझीपक्षाला बहुमत मिळाल्यामूळे हिंडेनबुर्गने हिटलरला चॅन्सेलर केले. एका टिकाकाराने म्हटले आहे की, "हिटलरची चॅन्सेलर म्हणून केलेली नेमणूक म्हणजे अध्यक्ष हिंडेनबुर्ग यांनी वाघावर बसून सहलीला जाण्यासारखे आहे". त्या टिकाकाराचे भाकीत थोडक्याच काळात खरे इरले. १९३३ मध्ये अध्यक्षाचा मृत्यू झाल्यानंतर सर्व सत्ता हिटलर कडे आली. सार्वमत घेऊन हिटलर जर्मनीचा सर्वसत्ताधीश झाला. १९३४ मध्ये प्रजासत्ताक नष्ट झाले व हुकूमशाहीचा प्रारंभ झाला. जर्मनी हे एक राष्ट्र, हिटलर नेता, नाझीपक्ष हिटलर राष्ट्रप्रमुख व लष्कर प्रमुख बनला.

**नाझीवादी आत्यंतीक परराष्ट्रीय धोरण**

नाझीपक्ष नावाने राष्ट्रीय समाजवादी होता. पण प्रत्यक्षात या पक्षाचे स्वरूप फॅसिस्ट होते. व्हर्सायच्या तहाचा बदला घेणे, जर्मन राष्ट्राला प्रतिष्ठा मिळवून देणे, राष्ट्रसंघाचे वर्चस्व न मानणे, वंशश्रेष्ठत्वाची भावना, ज्यू द्वेष, साम्राज्यवादी वृत्ती, आक्रमक राष्ट्रवाद हे या पक्षाचे तत्त्वज्ञान होते. हिटलरच्या पक्षाचा प्रमुख डॉ. गोबेल्स यांनी म्हटले होते. "पियानो वाजवून जसे आपल्या मनाप्रमाणे सूर काढता येतात" त्याप्रमाणे वृत्तपत्रकडून माझ्या मनाप्रमाणे सूर काढणे मला शक्य आहे. गोबेल्स तंत्र म्हणजे एखादी खोटी गोष्ट पुन्हा सांगून ती खरीच आहे असा प्रचार करणे. हिटलरने विशाल जर्मनी निर्माण करण्याची महत्त्वा ाकांक्षा बाळगली होती. त्यासाठी तयाने वैध अवैध साधनांचा सर्रास वापर केला. त्यातील नाझीवादी आत्यंतीक परराष्ट्रीय धोरण वापरले.

ऑस्ट्रीया, पोलंड, बेल्जियम, नार्वे, स्वीडन, डेन्मार्क, युगोस्लाव्हीया इत्यादी राष्ट्रांतील जर्मन प्रदेश जिंकून घेण्याचे मनसुबे हिटलरने रचले. फ्रान्स हा जर्मनीचा कट्टर शत्रु आहे. साम्यवादी रशियाही शत्रुच आहे. यासाठी शत्रुराष्ट्रांवर सुड उगवला पाहिजे. १९३३ मध्ये शस्त्रकपातीच्या परिषदेतून जर्मनीने निवृत्ती जाहीर केली. याला त्याने जर्मन जनतेचा पाठींबा मिळवला. राष्ट्रसंघातून बाहेर पडून जर्मनी शांततामय मार्गाने आपले प्रश्न सोडवेल असा आभास निर्माण करण्यात आला. पोलंडशी अनाक्रमण करार १९३४ मध्ये केला गेला. आणि ऑस्ट्रीया मध्ये नाझीची चळवळ सुरू केली. १९३५ मध्ये सारचा प्रदेश परत मिळवला. हिटलरने लोकांना करार धाब्यावर बसवून ऱ्हाईन लॅडमध्ये लष्करीतळ उभारला. १९३५ मध्ये इंग्लंडशी नाविक करार करून शांततेचे प्रदर्शन केले गेले. १९३६ मध्ये जनरल फ्रॅंकोला सक्रीय सहकार्य करण्यात आले. फ्रॅंकोने स्पेन मध्ये आपली हुकूमशाही स्थापन केली. रोम बर्लिन-टोकीयो अक्ष गटाने इटली, जपान, जर्मनी ही मित्र राष्ट्र झाली. १९३८ मध्ये म्युनिच येथे इंग्लंडचा चेंबरलेन फ्रेंच पंतप्रधान डॅलेडार इटलीचां सत्ताधिश मुसोलिनी व जर्मनीचा फ्यूरर हिटलर यांची बैठक झाली. व बैठकीत म्यूनिच करार होऊन जर्मनीला सुडेटन प्रांत मिळाला. (५)

अशारितीने हिटलरने आक्रमक राष्ट्र धोरण आखून आपली प्रादेशिकक भूक पूर्ण करण्याचा प्रयत्न केला. १ सप्टेंबर १९३९ मध्ये दुसरे महायुध्द सुरू झाले. हिटलरने मांडलेल्या तत्त्वाज्ञानात किंवा त्याच्या कृतीमध्ये कोठेही विचारांची प्रगल्भता आढळून येत नाही. हिटलरने नाझीवादाच्या आत्यतीक राष्ट्रवादातून महायुध्दात जगाला ओढले हे नाकारून चालणार नाही.

**संदर्भ साधणे :-**


१) आचार्य धनंजय, विसाव्या शतकातील जग, श्री साईनाथ पब्लिकेशन, नागपूर, २००७.

२) कोलारकर रा. गो., आधुनिक जग, श्री. मंगेश प्रकाशन, नागपूर, १९९५.

३) कुलकर्णी निलिमा, आधुनिक जगाचा इतिहास, टि. म. वि. पुणे, २००५.

४) जोशी पी. जी., आधुनिक जग, विद्याप्रकाशन, नागपूर, २०००.

५) डॉ. भामरे राजेंद्र, आधुनिक जगाचा इतिहास अर्थव प्रकाशन पुणे, २००४.